②

उ नि १८०
अर्ज प्रतिवादी नं २ अ तर्फे साक्षीदार यांचा सरतपास घेणेस परवानगीचा
ता.ता. ११।३।२६

# वेंगुर्ले येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

रे. दि. मु. नं.१९/२०१३

वसंत कृष्णा पांढरे वादी

वि.

शंकर यशवत भाटकर वगैरे २ प्रतिवादी

अर्ज प्रतिवादीनं. २ अ तर्फे असा की,

सदर दाव्यामधील प्रतिवादी नं. २ अ चा साक्षीदार घन:श्याम शांताराम अणसुरकर हे मागील तारखेस घरातील लग्नानिमित्त मुंबई येथे गेले असल्यामुळे मे. कोर्टामध्ये उपस्थित राहू शकलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी नं.२ अ याने नि.१८९ येथे दिलेला अर्ज मे. कोर्टाने नामंजुर करून प्रतिवादी नं२अ याचा पुरावा बंदचा आदेश केलेला आहे.

सदर साक्षीदार हा यापुर्वीच्या तारखांना मे. कोर्टामध्ये हजर होता. त्यावेळी वादी यांनी उलटतपासासाठी वेळोवेळी मुदती घेतलेल्या होत्या. आज रोजी साक्षीदार मे. कोर्टात उपस्थित असुन प्रतिवादी नं. २ अ तर्फे साक्षीदार यांचा सरतपास घेण्यास तयार आहे. तरी मे. कोर्टाने प्रतिवादी नं२अ याचा पुरावा बंदचा आदेश केलेला आहे तो रद्द करून प्रतिवादी नं.२ अ याला साक्षीदार याचा सरतपास घेण्यास परवानगी मिळावी अशी मे. कोर्टास विनंती आहे.

O
Other side to say
CJJD.

वेंगुर्ला

दिनांक-११/०३/२०२६ **श्री.आनंद मंगेश अणसुरकर**

Say on behalf of Pltf. **प्रतिवादी नं. २ अ**

No objection subject to cost for causing delay.

11-3-26 Adv. for Pltf.

11/3/26
सहायक अधीक्षक (आस्थापना),
दिवाणी न्यायालय, वेंगुर्ले

**प्रतिज्ञापत्र**

मी **श्री.आनंद मंगेश अणसुरकर** वय-५२ वर्षे,धंदा- शेती, रा. भेंडमळा,वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, वर लिहिलेल्या अर्जामधील सर्व मजकुर माझे माहीती व समजुती प्रमाणे पुर्ण खरा व बरोबर आहे म्हणून केले प्रतिज्ञापत्र

वेंगुर्ला

दिनांक-११/०३/२०२६

**श्री.आनंद मंगेश अणसुरकर**

**प्रतिवादी नं. २ अ**

सदर व्यक्तीस मी ओळखतो

ॲड. प्रेमानंद रत्नाकर नार्वेकर

Solemnly affirmed before me Anand Mangesh Anasurkar of Bhendmala, Vengurla
Who is identified before me by Shri P. R. Narvekar Advocate of Kudal.
Whom I personally know
Dated this 11/03 day of 2026

Asstt. Supdt. (Adm.,
Civil Court, Vengurla

CIVIL JUDGE, VENGURLA

Perused the application for ... Considering the reason evidence, order passed against the defendant no. 2A is hereby set aside.